# Review of Literature

**International Recognition Multidisciplinary Research Journal**

ISSN: 2347-2723 Impact Factor : 2.0210(UIF) Volume - 3 | Issue - 8 | March - 2016

## महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाण्यांच्या प्रगतीच्या व्यावसायिक वाटा ; एक चिकित्सक अभ्यास



प्राचार्य . डॉ . केंजळे . एस . आर .

मु . सा . काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर, ता . बरामती, जि . पुणे .

### प्रस्तावना –

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेला 99 वर्षांची होऊन शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे . राज्यामध्ये सर्वाधिक ठेवी असलेली बॅक म्हणून पुणे जिल्हा बॅकेचा प्रथम क्रमांक लागतो . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या ठेवी वाढल्या त्याचप्रमाणात कर्जवाटपदेखील वाढले आहे . वाढत्या कर्जवाटपामुळे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या नफ्यामध्येही वाढ झाल्याचे दिसते . क्रेंद्र सरकारचे, राज्य सरकारचे धोरण एक लाखापर्यंत शून्य टक्के व्याज आणि एक ते तीन लाखापर्यंत 2 टक्के व्याज असे असले तरी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेमध्ये 3 लाखापर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याजात दिले जाते . कर्जाचे योग्य वेळेत परतफेड न झाल्यास बॅकेच्या अनुत्पादक मालमत्तेमध्ये वाढ होते . बॅकेचे ढोबळ अनुत्पादक मालमत्तेचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण 4 . 86 टक्के आहे तर निव्वळ अनुत्पादक मालमत्तेचे निव्वळ कर्जाशी शेकडा प्रमाण 0 . 00 टक्के आहे, त्यामूळे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेने आपल्या अनुत्पादक मालमत्तेचे कार्यक्षम व्यवस्थापन करणे गरजेचे आहे .

### संशोधनाची विषयाची उद्दिष्टये (Objectives of Research)

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी खालील उद्दिष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत .

1 . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या अनुत्पादक मालमत्तेचा अभ्यास करणे .

2. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या ढोबळ अनुत्पादक मालमत्तेचा व निव्वळ अनुत्पादक मालमत्ता याचा आढावा घेणे .
3. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या अनुत्पादक मालमत्ता व्यवस्थापनाचे विश्लेषण करणे .

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश हा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या अनुत्पादक मालमत्तेचा विश्लेषनात्मक अभ्यास असल्याने या विषयाची व्यापकता विचारात घेऊन लिखित स्वरूपाच्या उपलब्ध साहित्य सामुग्रीचा वर्णनात्मक विश्लेषणात्मक दृष्टीकोनाचा अवलंब करण्यात आला आहे . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक 15 विभाग व 261 शाखांमध्ये विस्तारीत आहे .

**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या अनुत्पादक मालमत्तेचे विश्लेषन –**

**1. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या अनुत्पादक मालमत्तेचे वर्गीकरण –**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या कर्ज मालमत्तेचे वर्गीकरण प्रामुख्याने दोन विभागात केले जाते यामध्ये उत्पादित मालमत्ता व अनुत्पादक मालमत्ता हे दोन प्रकार पडतात . अनुत्पादक मालमत्ता म्हणजे बॅंकेची अशी कर्जे होय कि ज्यांची वसुली ठरावीक कालावधिमध्ये झालेली नाही व पुढिल कालावधिमध्ये होण्याची शक्यता कमी आहे . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या कर्ज मालमत्तेचे वर्गीकरण करण्यासाठी सन 2011-2012 ते सन 2015-2016 या मागिल पाच वर्षाची माहिती खालिल कोष्टकाद्वारे स्पष्ट करता येईल .


**कोष्टक क्रमांक 1**
**अनुत्पादक मालमत्तेचे वर्गीकरण**

(रू कोटी)

| अ. मा. वर्गीकरण | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| अंशतः उत्पादित कर्ज | 236 | 196 | 131 | 119 | 90 |
| संशयित कर्ज | 123 | 142 | 169 | 147 | 139 |
| बुडीत कर्ज | 10 | 10 | 12 | 10 | 12 |

(स्त्रोत : पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि . वार्षिक अहवाल सन 2011-2012 ते 2015-2016)

**आलेख क्रमांक 1**
**अनुत्पादक मालमत्तेचे वर्गिकरण**




कोष्टक क्रमांक 1 व आलेख क्रमांक 1 मध्ये पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची अनुत्पादक मालमत्ता स्पष्ट केली आहे . सन 2011-2012 ते 2014-2015 या आर्थिक वर्षातील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची एकूण अनुत्पादक मालमत्तेची संक्षिप्त आकडेवारी वरील कोष्टकात दर्शवली आहे . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची अनुत्पादक मालमत्ता तिन विभागात विभागली जाते यामध्ये अंशत: उत्पादित कर्जे, संशयित कर्जे व बुडीत कर्जे यांचा समावेश होतो .

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या एकूण अनुत्पादक मालमत्तेचा संक्षिप्त अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, एकूण अनुत्पादक मालमत्तेमध्ये अंशत: उत्पादित कर्जाचे प्रमाण सर्वाधिक असुन बुडीत कर्जाचे प्रमाण सर्वात कमी आहे . अंशत: उत्पादित कर्जामध्ये सातत्याने घट पहावयास मिळते . सन 2011-2012 मध्ये सर्वाधिक 236 कोटी रूपयांची अंशत: उत्पादित कर्जे असुन सन 2015-2016 मध्ये सर्वात कमी 90 कोटी रूपयांची अंशत: उत्पादित कर्जे आहेत .

मागिल पाच वर्षातील संशयित कर्जाचा संक्षिप्त अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, बॅंकेची संशयित कर्जामध्ये सन 2013-2014 पर्यंत वाढ होत होती परंतु सन 2014-2015 नंतर यात घट झाली आहे . सन 2013-2014 मध्ये सर्वाधिक 169 कोटी रूपयांची संशयित कर्जे असुन सन 2011-2012 मध्ये सर्वात कमी 123 कोटी रूपयांची संशयित कर्जे आहेत . संशयास्पद मालमत्ता असंरक्षित असेल तर 100 टक्के तरतूद व संरक्षित असेल तर एक वर्ष थकित रक्कमेसाठी 25 टक्के

व तिन वर्ष मालमत्ता थकित असेल तर **40** टक्के तरतूद याशिवाय मालमत्ता तिन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी थकित राहिल्यास **100** टक्के तरतुद करणे कायदयाने बंधनकारक आहे . त्यामुळे बॅकेने कर्ज थकित झाल्यावर लगेच वसुलीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे नाहीतर बॅकेला या कर्जाच्या थकवाकीसाठी तरतुदी कराव्या लागतात व या तरतुदी बॅकेच्या नफ्यातून केल्या जात असल्याने बॅकेचा मोठया प्रमाणातील नफ्याचा भाग यासाठी खर्च करावा लागतो . त्यामुळे बॅकेच्या नफा क्षमतेवर याचा परिणाम होताना दिसून येतो .

बुडित कर्जामध्ये सातत्याने चढउतार होत आहे . सन **2011-2012, 2012-2013** व **2014-2015** मध्ये **10** कोटी रूपयांची बुडित कर्जे असुन सन **2013-2014** व **2015-2016** मध्ये मध्ये **12** कोटी रूपयांची बुडित कर्जे आहेत . बॅकेला आपल्या बुडित कर्जासाठी **100** टक्के तरतुद करावी लागते कारण बॅक ही रक्कम भविष्यात कधिही वसूल करू शकत नाही त्यामुळे बॅकेने कर्ज बुडित होणार नाहीत याची काळजी घेणे अवश्यक आहे .

यावरून संशोधक अभ्यासकाच्या असा निष्कर्ष निघतो की, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेने अनुत्पादक मालमत्ता कर्जाचे योग्य नियोजन केल्यास व सुरवातीलाच जेव्हा कर्जे थकित होतात तेव्हाच त्या कर्जाच्या वसुलीसाठी प्रयत्न करणे महात्वाचे आहे . अंशत: उत्पादित कर्जाचे प्रमाण कमी करण्यासाठी बॅकेने प्रयत्न करावेत . कारण अंशत: उत्पादित कर्ज ही अनुत्पादक मालमत्तेची पहिली पायरी असल्याने अंशत: उत्पादित कर्जे वसुली करणे सोपे असते . संशयित व बुडीत कर्जाच्या वसुलीसाठी बॅकेला विशेष प्रयत्न करावे लागत असल्याने व या कर्जासाठी तरतुद **100** टक्के करावी लागत असल्याने बॅकेच्या नफ्याचा मोठा भाग या कर्जाच्या तरतुदीसाठी खर्च करावा लागतो .

## 2 . एन . पी . ए . कर्जासाठी तरतूद

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेला निव्वळ अनुत्पादक मालमत्ता शोधण्यासाठी ढोबळ अनुत्पादक मालमत्तेमधुन विशिष्ट तरतुदी वजा कराव्या लागतात . यासाठी अनुत्पादक मालमत्तेच्या तरतुदींचा अभ्यास करणे अवश्यक आहे . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या अनुत्पादक मालमत्तेच्या तरतुदींचा विश्लेषनात्मक अभ्यास करण्यासाठी सन **2011-2012** ते सन **2015-2016** या पाच वर्षाची माहिती खालिल कोष्टकाद्वारे स्पष्ट करता येईल .

**कोष्टक क्रमांक 2**

**एन . पी . ए . कर्जासाठी तरतूद**


(रू लाखात)

| कर्जासाठी तरतूद | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| आवश्यक तरतूद | १०९३१ | १००४६ | ११०५६ | १०६३९९ | १२२७५ |
| प्रत्यक्ष केलेली तरतूद | २८६४४ | ३४९४४ | ४१०५३ | ४६१४४ | ५१८२९ |

(स्त्रोत : पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि . वार्षिक अहवाल सन **2012** ते **2016**)

**आलेख क्रमांक 2**

**एन . पी . ए . कर्जासाठी तरतूद**




कोष्टक क्रमांक **2** व आलेख क्रमांक **2** मध्ये पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदी व प्रत्यक्षात केलेल्या तरतुदी स्पष्ट केल्या आहे . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदी व प्रत्यक्षात केलेल्या तरतुदींचा संक्षिप्त अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदीमध्ये सातत्याने चढउतार झालेली पहावयास मिळतो . सन **2015-2016** मध्ये सर्वाधिक **12275** लाख रूपयांची अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदी असुन अनुत्पादक मालमत्तेसाठी अवश्यक तरतुद सन **2012-2013** मध्ये सर्वात कमी **10046** लाख रूपये

आहेत .

अनुत्पादक मालमत्तेसाठी प्रत्यक्षात केलेल्या तरतुदीमध्ये सातत्याने वाढ झालेली पहावयास मिळतो . सन **2015-2016** मध्ये प्रत्यक्षात केलेली तरतुद सर्वाधिक **51829** लाख रूपयांची असुन प्रत्यक्षात केलेली तरतुद सन **2012-2013** मध्ये सर्वात कमी **28644** लाख रूपये आहे .

यावरून संशोधक अभ्यासकाच्या असा निष्कर्ष निघतो की, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदीपेक्षा जास्त पटीने प्रत्यक्षात तरतूद करीत असल्याने निव्वळ अनुत्पादक मालमत्ता मागिल पाच वर्षामध्ये कमी होत आहे . सन **2015-2016** मध्ये अनुत्पादक मालमत्तेसाठी अवश्यक तरतुदीची रक्कम **12275** लाख रूपये असुन त्यासाठी प्रत्यक्षात केलेली तरतुद **51829** लाख रूपयांची आहे याचाच अर्थ बॅंकेने अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदीपेक्षा **39554** लाख रूपयांची जास्त तरतुद केली आहे यामुळे बॅंकेची निव्वळ अनुत्पादक मालमत्ता कमी झाल्याचे दिसते परंतु बॅंकेची खरी आर्थिक परिस्थिती लक्षात येत नाही तरतुदीसाठी अवश्यक असणारी रक्कम बॅंक नफ्यातुन बाजुला काढत असल्याने बॅंकेच्या नफ्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते . यासाठी बॅंकेने तरतुदी करून निव्वळ अनुत्पादक मालमत्ता कमी करण्याएवजी थकित रक्कम वसुल करण्यावर भर दयावा .

## निष्कर्ष

**1** . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेने अनुत्पादक मालमत्ता कर्जाचे योग्य नियोजन केल्यास व सुरवातीलाच जेव्हा कर्जे थकित होतात तेव्हाच त्या कर्जाच्या वसुलीसाठी प्रयत्न करणे महात्वाचे आहे .

**2** . अंशत: उत्पादित कर्ज ही अनुत्पादक मालमत्तेची पहिली पायरी असल्याने अंशत: उत्पादित कर्जे वसुली करणे सोपे असते . संशयित व बुडीत कर्जाच्या वसुलीसाठी बॅंकेला विशेष प्रयत्न करावे लागत असल्याने व या कर्जासाठी तरतुद **100** टक्के करावी लागत असल्याने बॅंकेच्या नफ्याचा मोठा भाग या कर्जाच्या तरतुदीसाठी खर्च करावा लागतो .

**3** . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची ढोबळ अनुत्पादक मालमत्ता मागिल पाच वर्षामध्ये कमी होत आहे व त्याच बरोबर संशयित कर्जे व बुडित कर्जामध्ये सातत्याने चढउतार होत असल्याने या संशयित कर्जे व बुडित कर्जाचे योग्य नियोजन केल्यास या कर्जाचे प्रमाण कमी होण्यास
मदत होईल .

**4** . बॅंक मोठया प्रमाणात शेती व शेती सलग्न व्यवसायांसाठी कर्जाचा पुरवठा करत आहे . परंतु दुष्काळ, गारपिट व आवकाळी पाऊस इत्यादी नैसर्गिक संकटांपासुन शेती पिकाचे मोठयाप्रमाणात नुकसान होते . त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरो जावे लागत आहे . शेतकऱ्यांना नुकसान झाल्यास कर्जाची रक्कम थकित होण्याचा जास्त संभव असतो . अशा संकटांपासुन वाचण्यासाठी बॅंकेने सन **2015-2016** मध्ये शासनाची पीकविमा योजना बॅंकेने राबवली आहे या योजने अंतर्गत **40202** सभासद शेतकऱ्यांनी पीकाचा रूपये **3079 . 16** लाख रक्कमेचा विमा उतरवला असून रूपये **84 . 57** लाख रक्कमेचे विमा शुल्क विमा कंपणीकडे भरले आहे . यामुळे शेतकऱ्यांना सन **2015-2016** मध्ये खरीप हंगामासाठी विमा कंपणीकडून **12677** सभासदांकरिता एकूण नुकसान भरपाई म्हणुन रूपये **970 . 86** लाख इतकी मंजूर झाली आहे .

**5** . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदीपेक्षा जास्त पटीने प्रत्यक्षात तरतूद करीत असल्याने निव्वळ अनुत्पादक मालमत्ता मागिल पाच वर्षामध्ये कमी होत आहे . सन **2015-2016** मध्ये अनुत्पादक मालमत्तेसाठी अवश्यक तरतुदीची रक्कम **12275** लाख रूपये असुन त्यासाठी प्रत्यक्षात केलेली तरतुद **51829** लाख रूपयांची आहे याचाच अर्थ बॅंकेने अनुत्पादक मालमत्तेच्या अवश्यक तरतुदीपेक्षा **39554** लाख रूपयांची जास्त तरतुद केली आहे यामुळे बॅंकेची निव्वळ अनुत्पादक मालमत्ता कमी झाल्याचे दिसते परंतु बॅंकेची खरी आर्थिक परिस्थिती लक्षात येत नाही तरतुदीसाठी अवश्यक असणारी रक्कम बॅंक नफ्यातुन बाजुला काढत असल्याने बॅंकेच्या नफ्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते . यासाठी बॅंकेने तरतुदी करून निव्वळ अनुत्पादक मालमत्ता कमी करण्याएवजी थकित रक्कम वसुल करण्यावर भर दयावा .

## संदर्भ

**1** . महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे ः 'सहकारी महाराष्ट्र', ऑगष्ट ते डिसे . **2014** .

**2** . पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि . वार्षिक अहवाल सन **2012** ते **2016**

**3** . डॉ . अनिल प . कुलकर्णी . प्रा . अरूण गायकवाड . प्रा . मुकुंद देशपांडे . नंदा . स . लहाडे ः'व्यावसायिक संशोधन पद्धती',सक्सेस पब्लिकेशन,पुणे प्रथम आवृत्ती, जानेवारी **2009** .

**4** . डॉ . श्रीनिवास जोशी, डॉ . प्रकाश कोठारी, डॉ . नंदकिशोर दायमा ः 'मानवी संसाधन व्यवस्थापन', प्रशांत पब्लिकेशन **2011** .

**5** . प्रा . वा . भा . पाटील ः 'संशोधन पद्धती',श्री . मंगेश प्रकाशन (नागपूर) .

**6** . रणजित राजदूत ः 'संशोधन आराखडा',**2009** .

**7** . डॉ . दु . का . संत ः 'संशोधन पद्धती' डायमंड पब्लिकेशन् पुणे .